Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2512S01V13P015

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Dec'25
Issue–XII(I), Volume–XIII

# अमेरिकन टेरीफचे (आयात शुल्क) भारतीय अर्थव्यवस्थेच्या व्यापारावरील परिणामाचे तुलनात्मक अध्ययन

**प्रो.चुन्नीलाल प. साखरवाडे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय पे .पप (जवाहरनगर)
जि. भंडारा
मो.न . ९७६४५७१११९

**गोषवारा :**

भारताच्या वाढीच्या गतीला मजबूत करण्यासाठी वस्तूची सातत्याने वाढणारी देशातर्गत मागणी आणि निर्यात वाढीला गती प्राप्त झाली आहे. निर्यातीला चालना देण्यासाठी भारत देशाच्या वाणिज्य मंत्रालयाने व्याज अनुदान देणे, बँक कर्जाची उपलब्धता वाढविन्यासारखे उपाय केले आहेत. अमेरिकेकडून टेरीफ लागू केल्यानंतरही निर्यात वाढीत सातत्य दिसून येते. व्याज अनुदान योजना आणि निर्यात क्रेडीटला प्रोत्साहन देण्याचा समावेश केला जात आहे. केंद्र सरकारच्या " मेक ईन इडिया " उपक्रमामुळे जागतिक व देशांतर्गत उत्पादकासाठी अनुकूल वातावरण, स्वदेशी, व स्वावलंबी भारत तयार झाले आहे. अमेरिकेच्या टेरीफचा भारतीय अर्थव्यवस्थेतील व्यापारावर विशेष परिणाम झालेला दिसून येत नाही.

मुख्य शब्द :

आयात शुल्क, व्यापार, अर्थव्यवस्था, स्वावलंबी, वस्तूची मागणी

प्रस्तावना :

मागील ५० वर्षाहून अधिक काळ करदात्यांना वेठीस धरले गेले.नवीन महसूल मिळवीण्यासाठी आणि जागतिक व्यापारात निष्पक्षतेचे धोरण आणण्यासाठी तसेच येत्या काळात अमेरिकन देशाने कररचने मध्ये बदल केला. अमेरिका सहित अनेक देशांना सेवा निर्यात करणारा भारत एक प्रमुख देश आहे . भारतातून अमेरिकेत आयात होणाऱ्या वस्तूवर २५ टक्के टेरीफ लागू केले असतानाच रशिया कडून कच्चे खनिज तेल खरेदी करतो म्हणून अमेरिकेने भारत देशावर अतिरिक्त २५ टक्के दंड लावला आहे. भारत देशावर आता एकून ५० टक्के टेरीफ लागू करण्यात आले आहे.

उदिष्ट्ये :

१. अमेरिकेच्या टेरीफचा भारतीय उत्पादनावर झालेला परिणाम विचारात घेणे.
२. अमेरिकेने आयात शुल्क (टेरीफचा दर) ७ ऑगस्त २०२५ टेरीफचा दर व २७ ऑगस्त २०२५ आयात शुल्क (टेरीफचा दर) याची तुलना अध्ययनात घेतला आहे.

गृहीत कृत्य :

१ . वर्ष २०१९-२० मध्ये भारत देशाचा व्यापार १७.२६ बिलीयन डॉलर असून या वर्षा पासून प्रत्येक वर्षी वाढत जाऊन २०२३-२४ या वर्षी ३५.३२ बिलीयन डॉलर एव्हडा प्रचंड भारताचा अतिरिक्त व्यापारात वाढ झालेली आहे.
२ . २०२४ मध्ये अमेरिकेतून आयात केलेल्या वस्तूचे मूल्य व २०२४ मध्ये भारताने निर्यात केलेल्या वस्तूचे मूल्य (बिलीयन डॉलर मध्ये) वाढ झाली आहे.

सशोधन पद्धती :

प्रस्तुत विषयाचे सशोधन करण्यासाठी व साख्याकीय आकडेवारी एकत्रित करण्यासाठी प्राथमिक व दिवितीयक स्त्रोताचा उपयोग प्रस्तुत शोध निबंधात केला आहे.

प्राथमिक स्त्रोत – यामध्ये वर्णनात्मक सशोधनाचा पद्धती उपयोग केला जाऊन दोन देशातील व्यापारावर काय परिणाम पडला याचे अध्ययन यामध्ये केले आहे.

दिवितीयक स्त्रोत- यामध्ये साख्याकीय आकडेवारी एकत्रित करण्यासाठी पुस्तके,मासिके, दयनिक वृत्तपत्रे,विविध प्रशासकीय कार्यालये याचा उपयोग केला आहे.

स्पष्टीकरण :

भारतातून अमेरिकेत आयात होणाऱ्या वस्तूवर २५ टक्के टेरीफ लागू केले असतानाच रशिया कडून कच्चे खनिज तेल खरेदी करतो म्हणून अमेरिकेने भारत देशावर अतिरिक्त २५ टक्के दंड लावला आहे. अमेरिकेच्या टेरीफचा परिणाम झालेल्या भारतीय उत्पादनाची यादी खालील तालिका क्रमाक १ मध्ये दर्शविली आहे.

तालिका क्रमाक १

अमेरिकेच्या टेरीफचा परिणाम झालेल्या भारतीय उत्पादनाची यादी

| उत्पादन | टेरीफचा दर (७ ऑगस्त२०२५ ) | टेरीफचा दर (२७ ऑगस्त२०२५ ) |
|---|---|---|
| वस्त्रोद्योग व कपडे | २५ % | ५०% |
| रसायने (सेंद्रिय ) | २५ % | ५०% |
| आटोमोबाईलव आटोपार्टस | २५ % | ५०% |
| कृषी उत्पादने | २५ % | ५०% |
| यंत्रसामुग्रीआणि अभियांत्रिकी वस्तू | २५ % | ५०% |
| सिरम्यिक,काच ,दगड | २५ % | ५०% |
| रबर वस्तू | २५ % | ५०% |
| ऊर्जा उत्पादने | ० % | ० % |
| औषध निर्माण | ० % | ० % |
| इलेक्ट्रॉनिक आणि सेमी.कंडक्टर | ० % | ० % |
| महत्वाची खनिजे | ० % | ० % |

स्रोत : भारतीय औद्योगिक आणि कृषी उत्पादनावर अमेरिकन टेरीफचा आर्थिक परिणाम- दर्शक साख्याकीय आकडेवारी - गूगल वरून १६ आक्टोबर २०२५ आर.पी.आदित्य यांच्या कडून घेतली आहे.

वरील तालिका क्रमाक १ वरून असे दिसून येते की वस्त्रोद्योग व कपडे या पासून ते रबर वस्तू पर्यंत २५ % वरून ५० % पर्यंत टेरीफ आयात शुल्क लावण्यात आला आहे त्यामळे या उत्पादीत वस्तू विक्री करताना विशेष आर्थिक परिणाम झालेला दिसून येत नाही.

ऊर्जा उत्पादने, औषध निर्माण, इलेक्ट्रॉनिक आणि सेमी.कंडक्टर, महत्वाची खनिजे या उत्पादीत वस्तू निर्माण झाल्यावर विक्री करताना (० % आयात शुल्क) लावण्यात आलेला होता.

२०२४ मध्ये अमेरिकेतून आयात केलेल्या प्रमुख वस्तू तालिका क्रमाक २ मध्ये दर्शविल्या आहेत.

तालिका क्रमाक २

२०२४ मध्ये अमेरिकेतून आयात केलेल्या प्रमुख वस्तू

| अनु .क्रमाक | वस्तूची नावे | मूल्य (बिलीयन डॉलर मध्ये) |
|---|---|---|
| १ | कच्चे तेल | ४.५ |
| २ | पेट्रोलियम उत्पादने | ३.६ |
| ३ | कोळसा | ३.४ |

| | | |
|---|---|---|
| ४ | पॉलीश केलेले हिरे | २.६ |
| ५ | विद्युत्त यंत्रसामुग्री | १.४ |
| ६ | विमाने,अंतराळ यान आणि त्याचे सुटे भाग | १.३ |

स्रोत : भारताचा - अमेरिका व्यापार दृष्टीक्षेप दयनिक वृत्तपत्र : महाराष्ट्र टाइम्स- अर्थसंवाद - पेज नं.५ दिनांक : ४ एप्रिल २०२५ मधून घेतले आहे.

२०२४ मध्ये अमेरिकेतून निर्यात केलेल्या प्रमुख वस्तू तालिका क्रमाक ३ मध्ये दर्शविल्या आहेत.

तालिका क्रमाक ३

२०२४ मध्ये भारताने निर्यात केलेल्या प्रमुख वस्तू

| अनु .क्रमाक | वस्तूची नावे | मूल्य (बिलीयन डॉलर मध्ये) |
|---|---|---|
| १ | औषधाचे फोर्मुलेशंस | ८ .१ |
| २ | दूरसंचार उपकरणे | ६. ५ |
| ३ | मौल्यवानआणिअर्ध मौल्यवान खडे | ५ .३ |
| ४ | पेट्रोलियम उत्पादने | ४ .१ |
| ५ | सोनेआणि ईतर मौल्यवान धातूचे दागिने | ३ .२ |
| ६ | तयार कापडे | २ .८ |
| ७ | लोखंडआणिपोलादाची उपकरणे | २ .७ |

स्रोत : भारताचा - अमेरिका व्यापार दृष्टीक्षेप दयनिक वृत्तपत्र : महाराष्ट्र टाइम्स- अर्थसंवाद पेज नं.५ दिनांक: ४ एप्रिल २०२५ मधून घेतले आहे.

वरील तालिका क्रमाक २ व ३ वरून असे दिसून येते की २०२४ मध्ये भारताने आयात व निर्यात वस्तू केलेल्या प्रमुख मध्ये निर्यात केलेल्या प्रमुख वस्तूचे प्रमाण ८ .१ याचा अर्थ दुप्पट आहे असे स्पष्ट होते.

तालिका क्रमाक ४

वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ मधील भारताचा अतिरिक्त व्यापार

| अनु .क्रमाक | वर्ष | फरक (बिलीयन डॉलर मध्ये) |
|---|---|---|
| १ | २०२३-२४ | ३५.३२ . |
| २ | २०२२ -२३ | २७.७ |
| ३ | २०२१ -२२ | ३२.८५ |
| ४ | २०२०-२१ | २२.७३ |
| ५ | २०१९-२० | १७.२६ |

स्रोत : भारताचा - अमेरिका व्यापार दृष्टीक्षेप, दयनिक वृत्तपत्र : महाराष्ट्र टाइम्स - अर्थसंवाद पेज नं.५ दिनांक: ४ एप्रिल २०२५ मधून घेतले आहे.

वरील तालिका क्रमाक ४ वरून असे दिसून येते की वर्ष २०१९-२० मध्ये भारत देशाचा व्यापार १७.२६ बिलीयन डॉलर असून या वर्षा पासून प्रत्येक वर्षी वाढत जाऊन २०२३-२४ या वर्षी ३५.३२ बिलीयन डॉलर एव्हडा प्रचंड भारताचा अतिरिक्त व्यापारात वाढ झालेली आहे हे स्पष्ट होते.

https://doi.org/10.69758/GIMRJ/2512S01V13P015
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Dec'25
Issue–XII(I), Volume–XIII

अमेरिकेच्या टेरीफचा (आयात शुल्क) परिणाम :

१ . अमेरिकेकडून टेरीफ लागू केल्यानंतरही वाढीत सातत्य - मुडीजच्या निरीक्षणनुसार प्रगत अर्थव्यवस्थेची वाढ १.५ % तर विकासशील बाजारपेठेची वाढ ४ % राहण्याचा अंदाज आहे.

२ . टेरीफचा धक्का सहन करणारी भारत देशाची निर्यात एकूण जीडीपी चा फार थोडा भाग आहे - भारत देशाच्या निर्यातीत जुलै २०२५ मध्ये ७.२९ % नी वाढ झाली आहे. भारत देशाची निर्यात जुलै २०२५ मध्ये ३७.२४ अब्ज डॉलरवर झाली आहे.

३ . अमेरिकेच्या टेरीफचा भारतीय अर्थव्यवस्थेवर विशेष परिणाम नाही- भारतीय अर्थव्यवस्था ६० % देशांतर्गत व्यापारावर अवलबून आहे ४० % जागतिक व्यापारावरील योगदान आहे.

४ . अनेक देशा सोबत द्विपक्षीय व्यापारी करार - आयात व निर्याती मधील तफावत कमी करण्यासाठी निर्यातीची उलाढाल मोठ्या प्रमाणात वाढविण्याचे उदिष्ट्ये केंद्र सरकारने आखले आहे.

५. १८ देशाशी मुक्त व्यापार करार – भारत देशांने १८ देशाशी मुक्त व्यापार करार करून निर्यातीला प्रबळ चालना देण्याचा प्रयत्न केला आहे.

निष्कर्ष :

१. २०२४ मध्ये भारताने आयात व निर्यात केलेल्या प्रमुख वस्तू मध्ये निर्यात केलेल्या प्रमुख वस्तूचे प्रमाण ८ .१ याचा अर्थ दुप्पट आहे असे स्पष्ट होते.
२. वर्ष २०१९-२० मध्ये भारत देशाचा व्यापार १७.२६ बिलीयन डॉलर असून या वर्षा पासून प्रत्येक वर्षी वाढत जाऊन २०२३-२४ या वर्षी ३५.३२ बिलीयन डॉलर एव्हडी प्रचंड भारताच्या अतिरिक्त व्यापारात वाढ झालेली आहे हे स्पष्ट होते.
३. अमेरिकेकडून टेरीफ लागू केल्यानंतरही वाढीत सातत्य.
४. टेरीफचा धक्का सहन करणारी भारत देशाची निर्यात एकूण जीडीपी चा फार थोडा भाग आहे.
५. अमेरिकेच्या टेरीफचा भारतीय अर्थव्यवस्थेवर विशेष परिणाम झालेला नाही.

साराश :

भारताच्या वाढीच्या गतीला मजबूत करण्यासाठी वस्तूची सातत्याने वाढणारी देशातर्गत मागणी आणि निर्यात वाढीला गती प्राप्त झाली आहे. निर्यातीला चालना देण्यासाठी भारत देशाच्या वाणिज्य मंत्रालयाने व्याज अनुदान देणे, बँक कर्जाची उपलब्धता वाढविन्यासारखे उपाय केले आहेत. अमेरिकेकडून टेरीफ लागू केल्यानंतरही निर्यात वाढीत सातत्य दिसून येते. व्याज अनुदान योजना आणि निर्यात क्रेडीटला प्रोत्साहन देण्याचा समावेश केला जात आहे. केंद्र सरकारच्या " मेक ईन इडिया " उपक्रमामुळे जागतिक व देशांतर्गत उत्पादकासाठी अनुकूल वातावरण, स्वदेशी, व स्वावलंबी भारत तयार झाले आहे. अमेरिकेच्या टेरीफचा भारतीय अर्थव्यवस्थेतील व्यापारावर विशेष परिणाम झालेला दिसून येत नाही.

संदर्भ सुचि :

१ . डॉ. मुकर्जी एन. रवींद्र- सामाजिक शोध व साख्याकी – पृष्ठ क्र.१३१
२ .भारताचा - अमेरिका व्यापार दृष्टीक्षेप दयनिक वृत्तपत्र : महाराष्ट्र टाइम्स - अर्थसंवाद पेज नं.५ दिनांक: ४ एप्रिल २०२५
३. डॉ.सक्सेना साधना- आंतरराष्ट्रीय व्यापार एव.व्वीत-पृष्ठ क्र.१०५

https://doi.org/10.69758/GIMRJ/2512S01V13P015
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Dec'25
Issue–XII(I), Volume–XIII

४.भारतीय औद्योगिक आणि कृषी उत्पादनावर अमेरिकन टेरीफचा आर्थिक परिणाम दर्शक साख्याकीय आकडेवारी - गूगल वरून १६ आक्टोबर २०२५ आदित्य आर.पी.
५.दयनिक वृत्तपत्र : महाराष्ट्र टाइम्स-अर्थसंवाद पेज नं.१३ दिनांक : १५ ऑगस्ट २०२५
६.दयनिक वृत्तपत्र : महाराष्ट्र टाइम्स- देश-विदेश पेज नं.८ दिनांक : १४ नोव्हेंबर २०२५
७.दयनिक वृत्तपत्र : महाराष्ट्र टाइम्स- मंथन पेज नं.९ दिनांक : २ ऑगस्ट २०२५
८.दयनिक वृत्तपत्र : महाराष्ट्र टाइम्स- पेज नं.१ दिनांक : २७ ऑगस्ट २०२५
९.दयनिक वृत्तपत्र : महाराष्ट्र टाइम्स- विचार पेज नं.६ दिनांक : २५ एप्रिल २०२५